# तात्पुरती कार्यावली

**बुधवार, दिनांक ४ जुलै २०१८ रोजी सकाळी ११-०० वाजता नागपूर येथील विधान भवनात सुरू होणाऱ्या महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०१८ च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनाची तात्पुरती कार्यावली**

**एक.** अध्यक्षांनी, सभाध्यक्ष तालिकेवर सदस्य नामनिर्देशित करणे.

**दोन.** अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

**तीन.** प्रश्नोतरे.

**चार.** सन २०१८-२०१९ च्या पुरवणी मागण्या सादर करणे.

**पाच.** सन २०१८-२०१९ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान.

**सहा.** लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे.

**सात.** अंदाज समितीचे अहवाल सादर करणे.

**आठ.** सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे.

**नऊ.** विधानसभा आश्वासन समितीचे अहवाल सादर करणे.

**दहा.** अनुसूचित जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

**अकरा.** पंचायती राज समितीचे अहवाल सादर करणे.

**बारा.** रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे.

**तेरा.** मराठी भाषा समितीचा अहवाल सादर करणे.

**चौदा.** **शासकीय विधेयके.**

**खालील विधेयके विधानसभेकडे विचारार्थ प्रलंबित आहेत :—**

(१) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६४ - महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७.

(२) सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ४ - हैदराबाद अतियात चौकशी (सुधारणा) विधेयक, २०१८.

(३) सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक १४ - महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ (सुधारणा) विधेयक, २०१८.

(४) सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक २६ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१८.

(५) सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक २९ - महाराष्ट्र (लोकसेवकांची) विसंगत प्रमाणातील मालमत्ता सरकारजमा करण्याबाबत विधेयक, २०१८.

(६) सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ३१ - महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण (सुधारणा) विधेयक, २०१८.

(७) सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ३२ - महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्याआवश्यक वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती, यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१८.

**पंधरा.** इतर शासकीय कामकाज ज्याची सूचना नंतर देण्यात येईल.

**सोळा.** शोक प्रस्ताव.

**सतरा.** **अशासकीय विधेयके :—**

**विचारार्थ –**

(१) सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक ११ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०१५ - **श्री. छगन भुजबळ, वि.स.स. यांचे.**

(२) सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक ६६ - अल्पसंख्याक समाज (अत्याचारास प्रतिबंध) विधेयक, २०१५ - **श्री. अमीन पटेल, वि.स.स. यांचे.**

(३) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ४३ - महाराष्ट्र लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती व जाहिरात-फलक लावण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०१६ - **श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचे.**

(४) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ५१ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१६ - **श्री. मनोहर भोईर, वि.स.स. यांचे.**

(५) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन (सुधारणा) विधेयक, २०१७ - **श्री. मनोहर भोईर, वि.स.स. यांचे.**

(६) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १४ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०१७ - **श्री. मंगलप्रभात लोढा, वि.स.स. यांचे.**

(७) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २२ - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७ - **ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांचे.**

(८) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३० - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०१७ - **श्री. मनोहर भोईर, वि.स.स. यांचे.**

(९) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६९ - महाराष्ट्र लोकसेवा हक्क (सुधारणा) विधेयक, २०१७ - **श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे.**

(१०) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ७० - सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७ - **श्री. मंगलप्रभात लोढा, वि.स.स. यांचे.**

**अठरा.** सभागृहासमोर ठेवण्यात आलेली कागदपत्रे (यादी स्वतंत्ररित्या वितरित करण्यात येईल).

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ५ जून २०१८.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई